


ऑपरेशन अभ्यास अंतर्गत दक्षिण गोव्यात 'मॉक ड्रिल'
» पान ३ वर


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




रोहित शर्माने अखेर घेतली निवृत्ती
» पान ४ वर


वेर्णा, गुरुवार, ८ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 245 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 8 May 2025 | Pages 4 | ₹ 4


## निवडक

### छत्तीसगडमध्ये चकमक; २६ नक्षलवादी ठार

**बिजापूर, दि. ७ :** भारताकडे एकीकडे दहशतवाद्यांविरोधात ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तान धडा शिकवला आहे. तर, दुसरीकडे सुरक्षा दलांकडून नक्षलवाद्यांविरोधात मोठी कारवाई करण्यात येत आहे. छत्तीसगड-तेलंगण सीमेजवळ बिजापूरमध्ये सुरू असलेल्या चकमकीत २६ नक्षलवादी ठार झाले आहेत.

सुरक्षा दलांचे जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये छत्तीसगड-तेलंगण सीमेवरील बिजापूर जिल्ह्यातील करेगुट्टा टेकड्यांजवळ चकमक झाली. छत्तीसगड-तेलंगण सीमेवरील करेगुट्टा टेकड्यांजवळ ही नक्षलविरोधी मोहीम सुरू आहे. आतापर्यंत येथे सुरक्षा दलांच्या कारवाईत २६ नक्षलवादी ठार झाले आहेत, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली.

---

### भारत २०४० पर्यंत चंद्रावर उतरणार

**नवी दिल्ली, दि. ७ :** २०४० पर्यंत भारतीय अंतराळवीर चंद्रावर पोहोचेल. येत्या आठवड्यात एक भारतीय आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणार आहे. ही भारतासाठी अभिमानाची गोष्ट आहे. चंद्राव्यतिरिक्त, मंगळ आणि शुक्र देखील आपल्या रडारवर आहेत, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. पंतप्रधान बुधवारी अंतराळ संशोधनावरील जागतिक परिषदेत सहभागी झाले. पंतप्रधान म्हणाले की, चांद्रयान-१ ने चंद्रावर पाण्याचा शोध लावण्यास मदत केली. चांद्रयान-२ मोहीम यशस्वी झाली. चांद्रयान-२ ने उच्च रिझोल्यूशनचे फोटो पाठवले होते. भारतीय अंतराळवीर लवकरच अंतराळात जाणार आहेत. आपले पहिले मानवी अंतराळ मोहीम, गगनयान, आपल्या देशाच्या वाढत्या आकांक्षा अधोरेखित करते. येत्या काही आठवड्यात, एक भारतीय अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर इस्रो-नासा यांच्या संयुक्त मोहिमेचा भाग म्हणून अंतराळात प्रवास करेल.

---

### पंजाबमध्ये विमान कोसळून एकाचा मृत्यू

**भटिंडा, दि. ७** पहलगाम हल्ल्याच्या १६ व्या दिवशी भारताने पाकड्यांविरोधात एअर स्ट्राईक केला. हिंदुस्थानने 'ऑपरेशन सिंदूर' च्या माध्यमातून पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. हिंदुस्थानने पाकव्याप्त कश्मीरमधील ९ दहशतवादी तळांवर हल्ला करून ते उद्ध्वस्त केले. भारताने केलेल्या हवाई हल्ल्यादरम्यान पंजाबमधील भटिंडा येथील गव्हाच्या शेतात एक विमान कोसळले. या अपघातामध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाला तर ९ जण जखमी झाले. भटिंडातील गोनियाना मंडीतील अकलियां कलां गावात पहाटे २ वाजता ही घटना घडली. ऑपरेशन सिंदूर सुरू असताना एक विमान शेतात कोसळले. त्यानंतर लगेचच त्या विमानाला आग लागली. या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून ९ जण जखमी झाले आहेत.

---

### इस्रायलकडून ५० ठिकाणी हल्ले

**अवीव्ह, दि. ७ :** इस्रायलच्या तेल अवीव्ह येथील बेन गुरीयन आंतरराष्ट्रीय विमानतळावर हुती बंडखोरांनी केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्याचा इस्रायलने ताबडतोब बदला घेतला. येमेनच्या हुती बंडखोरांच्या नियंत्रणाखाली असलेल्या बंदरांचे शहर हुदैदाह येथे २० फायटर जेट्समधून तब्बल ५० ठिकाणी बॉम्बहल्ले करण्यात आले. २ हजार किमी अंतरावरून अचूक लक्ष्यभेद करण्यात आला. हुदैदार बंदर आणि बाजिल पंक्रीट फॅक्टरीला निशाणा बनवण्यात आले.

# अखेर बदला! ऑपरेशन 'सिंदूर' फत्ते!

## भारतीय हवाई हल्ल्यात पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे ९ तळ बेचिराख! शंभरपेक्षा जास्त दहशतवादी ठार

■ नवी दिल्ली, दि. ७ :

**भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मिरमधील अतिरेक्यांचे नऊ तळ उद्धवस्त करून 'ऑपरेशन सिंदूर' ही मोहीम फत्ते केली. ६ मे च्या मध्यरात्री दहशतवादी अड्ड्यांवर हल्ले करुन, भारताने पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. मध्यरात्री १:०५ वाजता 'ऑपरेशन सिंदूर' सुरू होऊन दीड वाजता ते यशस्वीरित्या पूर्ण झाले. यामध्ये शंभरहून अधिक दहशतवादी ठार झाले आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे या मोहिमेत भारतीय हवाई दलाने पाकिस्तानी नागरिक किंवा पाकिस्तानी लष्कराच्या कोणत्याही ठिकाणांवर हल्ला केला नाही. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सेनेने बहावलपूरमध्ये जैश ए मोहम्मदचे हेडक्वार्टर उद्ध्वस्त केले.**



OPERATION SINDOOR



पाकिस्तानात १०० किमी आत घुसून नऊ दहशतवादी तळ उद्धवस्त केले, अशी माहिती भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूरनंतर दिली. अवघ्या २३ मिनिटांत भारतीय सैन्यदलांकडून ऑपरेशन सिंदूर फत्ते करण्यात आले. पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त करण्यात आले. ऑपरेशन सिंदूरबाबत भारतीय सैन्याने दिलेल्या पत्रकार परिषदेत दोन महिला अधिकाऱ्यांचाही समावेश होता. भारतीय लष्कराकडून कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी ऑपरेशन सिंदूरची सगळी माहिती दिली. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानचा पुराव्यांसह बुरखा फाडला. लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांनी या मोहिमेबाबत माहिती देताना सांगितले की, २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू करण्यात आले होते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान, निष्पाप नागरिकांना इजा होणार नाही, याची काळजी घेण्यात आली. मार्च २०२५ मध्ये जम्मू आणि काश्मीरमधील चार जवानांची हत्या करण्यात आली होती. मुंबई दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणांनाही लक्ष्य करण्यात आले आहे. मरकज सुभानल्लाह हे जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय होते. येथे दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जात असे. कोणत्याही लष्करी ठिकाणाला लक्ष्य करण्यात आले नाही आणि नागरिकांची जीवितहानी झाली नाही, अशी माहिती लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली आहे. यावेळी त्यांनी टार्गेट असलेली आणि ती ठिकाणे उद्ध्वस्त झाल्याचे फोटो देखील दाखवले.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, पाकिस्तानविरोधात भारतीय सैन्याने 'अचूकता, सतर्कता आणि संवेदनशीलते'ने कारवाई केली आहे. पाकिस्तानने प्रत्युत्तरादाखल केलेल्या हल्ल्यात १५ भारतीयांचा मृत्यू झाला आहे तर ४३ लोक जखमी झाले आहेत.जम्मू आणि काश्मीरमधील पूंछ आणि तंगधार येथील नागरी भागात गोळीबाराचा परिणाम झाला आहे, असे भारतीय लष्कराने म्हटले आहे. मंगळवारी रात्री, भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये अनेक ठिकाणी हवाई हल्ले केले, ज्यात २६ नागरिक ठार आणि ४६ जखमी झाले, असे पाकिस्तानी लष्करी प्रवक्त्याने सांगितले.

### १८ एअरपोर्ट्सचे ऑपरेशन बंद

**पाकिस्तानवरील हवाई हल्ल्यानंतर भारताने ७ राज्यांमधील १८ विमानतळांवरील विमान वाहतूक बंद केली आहे. प्रमुख विमानतळांमध्ये श्रीनगर, जम्मू, लेह, चंदीगड, बिकानेर, जोधपूर, राजकोट, धर्मशाळा, अमृतसर, भुज आणि जामनगर यांचा समावेश आहे. ही विमानतळे पाकिस्तान सीमेजवळ आहेत. एअर इंडिया, इंडिगो, स्पाइसजेट, एअर इंडिया एक्सप्रेस, अकासा एअर आणि काही परदेशी विमान कंपन्यांनी सुमारे २०० उड्डाणे रद्द केली आहेत.**

### 'ऑपरेशन सिंदूर ' हे नाव का ?

**जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण भारतात संतापाची लाट पसरली होती. या दहशवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकाचा मृत्यू झाला होता. मात्र, या भ्याड हल्ल्यातील सर्वात भयावह गोष्ट म्हणजे दहशतवाद्यांनी सामान्य पर्यटकांना लक्ष केले. सोबतच पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून गोळी झाडली आहे. या कृत्याने नक्कीच एक गोष्ट अधोरेखित केली जात आहे ती म्हणजे हा हल्ला केवळ देशावर नाही तर त्यामागे धार्मिक आणि देशाच्या एकात्मतेवर ही हल्ला असल्याचे बोलले जात आहे. या भ्याड हल्ल्यावेळी महिलांचं कुंकू म्हणजे त्यांच्या पतींना लक्ष करण्यात आले. दहशतवाद्यांचा हेतू केवळ त्यांना जिवानिशी मारण्याचाच नव्हता, तर भारतीय संस्कृती, देशातील एकता आणि देशाच्या आत्म्यावर हल्ला करण्याचा होता. त्यामुळे अनेक निष्पापांचे कुंकू पुसल्या गेलेल्या पीडित कुटुंबियांना काही अंशी न्याय देण्याच्या हेतूने या मोहिमेला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आले.**

# राजधानीत नागरिक संरक्षण यंत्रणांचा सज्जता सराव

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पणजी, दि. ७ :** उत्तर गोव्याचे उपजिल्हाधिकारी विनायक च्यारी यांच्या देखरेखीखाली बुधवारी पणजी शहरात आपत्कालीन परिस्थितीचे मॉक ड्रिल यशस्वीरीत्या पार पडले . या सरावामध्ये किनारपट्टी भागात हवाई हल्ल्याच्या संभाव्य धोक्याची कल्पना करून आपत्कालीन प्रतिसादाची चाचणी घेण्यात आली.

पणजी फेरी घाट आणि मांडवी पूल परिसरात सरावाचे मुख्य आयोजन करण्यात आले होते. मॉक ड्रिलमध्ये मांडवी पूल अंशतः कोसळल्याचा प्रसंग उभा करण्यात आला होता. तसेच काही व्यक्ती आणि वाहने पाण्यात अडकून पडल्याचे चित्रण करण्यात आले. मिरामार येथील इंडियन नॅशनल वॉटरस्पोर्ट्स सेंटर आणि कोलवाळ मधील गोवा ग्लास फायबर लिमिटेडमध्येही स्वतंत्र सराव घेण्यात आले. पणजी हे समुद्रकिनारी शहर असल्याने, हवाई ड्रोन हल्ल्याचा धोका अधिक आहे, असे च्यारी यांनी स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, हा सराव नागरी संरक्षणाच्या दृष्टीने नागरिकांना सजग करण्यासाठी होता. हल्ल्यानंतर तातडीने बचावकार्य सुरू करण्याची प्रक्रिया या सरावाद्वारे राबवण्यात आली.

या मॉक ड्रिलमध्ये अग्निशमन विभाग, पोलिस दल, बंदरांचे कॅप्टन, नदी नेव्हिगेशन विभाग यांचा समन्वय साधून एकत्रित कार्यवाही करण्यात आली. दोन ते तीन व्यक्ती बुडाल्याचे दाखवण्यात आले, ज्यामुळे शोध आणि बचाव कार्य सुरू झाले.

विशेष म्हणजे, रात्रीच्या हल्ल्याच्या संभाव्य स्थितीचेही अनुकरण करण्यात आले. जर सायरन वाजला, तर प्रथम दिवे बंद करून सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा, अशा सूचना देण्यात आल्या, असे च्यारी यांनी सांगितले.

# 'हिटमॅन'चा कसोटी क्रिकेटला गुडबाय



**मुंबई, दि. ७ :**

भारताचा कसोटी कर्णधार रोहित शर्माने अचानक कसोटीमधून निवृत्ती जाहीर करत सर्वांनाच धक्का दिला आहे. रोहित शर्माने इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर करत कसोटीमधून निवृत्ती घेत असल्याची माहिती सर्वांना दिली. भारतीय संघ आयपीएलनंतर पुढील महिन्यात इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. पण त्याआधीच रोहित शर्माने निवृत्ती जाहीर करत मोठा धक्का दिला. मागच्या वर्षी टी-२० वर्ल्ड कप जिंकल्यानंतर रोहित शर्माने टी-२० आंतरराष्ट्रीय फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली होती, त्यानंतर आता रोहितने टेस्ट क्रिकेटलाही अलविदा केले आहे, त्यामुळे हिटमॅन आता फक्त वनडे फॉरमॅटमध्ये खेळताना दिसणार आहे.

रोहित शर्माने इन्स्टाग्रामवर कसोटी क्रिकेटची डेब्यू कॅपचा फोटो पोस्ट करत कॅप्शन लिहिलं की, मला सर्वांना हे सांगायचं आहे की मी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेत आहे. कसोटी क्रिकेटमध्ये देशाचं नेतृत्त्व करणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. मला इतकं वर्ष खूप प्रेम आणि कायम पाठिंबा दिल्याबद्दल सर्वांचे खूप आभार. मी वनडे क्रिकेटमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत राहणार आहे.

# भारताच्या हवाई हल्ल्यांवर जागतिक नेत्यांच्या प्रतिक्रिया

## संयम बाळगण्याचे केले आवाहन | भारताकडून दहशतवादी तळांना केले गेले लक्ष्य

**नवी दिल्ली, दि. ७ :**

भारताने मंगळवारी मध्यरात्रीनंतर पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत केलेल्या हवाई हल्ल्यांमुळे भारत - पाकिस्तानदरम्यानचा तणाव वाढला असून अमेरिका, चीन, रशिया, तुर्की आणि संयुक्त राष्ट्रांसह अनेक देशांनी दोन्ही देशांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे.

पाकिस्तानने या हल्ल्यांत २६ जण ठार आणि ४६ जखमी झाल्याचा दावा केला आहे. भारताने मात्र, या कारवाईत केवळ दहशतवादी तळांवरच लक्ष केंद्रित केले असून सामान्य नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घेतल्याचे स्पष्ट केले आहे. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी हल्ल्यानंतर लगेचच अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्याशी संवाद साधल्याचे वॉशिंग्टनमधील भारतीय दूतावासाने जाहीर केले. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या परिस्थितीला दुर्दैवी म्हटले असून, हे लवकर संपेल अशी आशा आहे, असे त्यांनी व्हाईट हाऊसमध्ये सांगितले. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अरघची बुधवारी भारत दौऱ्यावर पोहोचले. ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू व परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांची भेट घेणार आहेत. याआधी त्यांनी पाकिस्तानात लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर व पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्याशी चर्चा केली होती. इराणने भारत-पाकिस्तानदरम्यान मध्यस्थीची तयारी दर्शवली आहे.



दरम्यान, चीनने भारताच्या हवाई कारवाईबाबत खेद व्यक्त करत दोन्ही देशांनी शांतता राखावी असे म्हटले. परराष्ट्र मंत्रालयाने दोन्ही देशांमध्ये वाढत्या तणावाबद्दल चिंता व्यक्त करत संयम राखण्याचे आवाहन केले. रशियानेही दोन्ही देशांमध्ये वाढत्या लष्करी संघर्षाबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली असून, शांततापूर्ण संवादातून तोडगा काढावा अशी भूमिका मांडली. रशियाने दहशतवादाविरोधात आंतरराष्ट्रीय समुदायाने एकत्र यावे असेही नमूद केले. तुर्कीनेही भारत-पाकिस्तान दरम्यानच्या परिस्थितीकडे लक्ष ठेवले असल्याचे सांगत नागरी ठिकाणांवरील हल्ल्यांचा निषेध केला. त्यांनी एकतर्फी कारवायांपासून दूर राहण्याचे आवाहन करत पाकिस्तानच्या पहलगाम हल्ल्याच्या चौकशीच्या मागणीला पाठिंबा दर्शवला. इस्रायलने भारताच्या स्वसंरक्षणाच्या अधिकाराला पाठिंबा दर्शवला आहे. भारतातील इस्रायली राजदूत रुवेन अझर यांनी दहशतवाद्यांना निष्पाप लोकांविरुद्ध गुन्हे करून वाचता येणार नाही, असे एक्स वर लिहिले. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी देखील भारताच्या कारवायांविषयी चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या प्रवक्त्यांनी स्पष्ट केले की, भारत आणि पाकिस्तानमधील लष्करी संघर्ष जगासाठी धोकादायक आहे, आणि दोन्ही देशांनी जास्तीत जास्त संयम पाळावा.

दरम्यान, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटले आहे की भारतीय लष्कराने पाकिस्तानविरुद्ध 'अचूकता, दक्षता आणि संवेदनशीलते'ने कारवाई केली आहे. सीमा रस्ते संघटनेच्या (बीआरओ) स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले की, आपल्या भारतीय सैन्याने सर्व भारतीयांना अभिमान वाटला आहे. भारतीय सैन्याने एक नवा इतिहास रचला आहे. भारतीय सैन्याने अचूकता, सतर्कता आणि संवेदनशीलतेने कारवाई केली. जे लक्ष्य निश्चित केले होते ते अचूकतेने आणि नियोजित योजनेनुसार नष्ट केले गेले. कोणत्याही नागरी स्थानावर किंवा नागरी लोकसंख्येवर अजिबात परिणाम होणार नाही याची खात्री करण्यासाठी संवेदनशीलता देखील दाखवण्यात आली. रामायणातील अशोक वाटिका प्रकरणाचा उल्लेख करताना राजनाथ सिंह म्हणाले की, आम्ही (भारतीय सैन्य) हनुमानजींच्या आदर्शांचे पालन केले. संरक्षण मंत्री म्हणाले, आम्ही फक्त त्यांनाच मारले ज्यांनी आमच्या निष्पाप लोकांना मारले.